**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४२ वा | दिनांक : २२/०७/२०२५ | वार : मंगळवार

## मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील बारा आरोपी निर्दोष



**पुणे** : मुंबईतील लोकल रेल्वेगाड्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी साखळी बॉम्बस्फोटांनी संपूर्ण देशाला हादरवून सोडले होते. या स्फोटांत २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि ७०० पेक्षा जास्त लोक जखमी झाले होते. या प्रकरणातील १२ आरोपींना १९ वर्षांनंतर मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष घोषित केले. या निकालाने केवळ एक खटला संपला नसून, आपल्या तपास यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि व्यवस्थेमधील धार्मिक पूर्वग्रहांवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर मूलनिवासी मुस्लिम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार यांनी या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया देत, देशात २००२ नंतर झालेल्या सर्व बॉम्बस्फोट प्रकरणांचा नव्याने आणि स्वतंत्र यंत्रणेमार्फत सखोल तपास करण्याची मागणी केली आहे.

११ जुलै २००६ रोजी मुंबईला हादरवणाऱ्या साखळी बॉम्बस्फोटातील १२ आरोपींची तब्बल १९ वर्षांनी निर्दोष मुक्तता ही केवळ एका खटल्याची समाप्ती नाही, तर आपल्या न्यायव्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर, तपास यंत्रणांच्या भूमिकेवर, आणि विशेषतः त्यांच्यातील धार्मिक पूर्वग्रहदूषित कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना आहे, असे अंजुम इनामदार म्हणाले.

'न्याय उशिरा मिळणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच आहे' या उक्तीचा हा प्रत्यक्ष अनुभव आहे. ज्या व्यक्तींनी आपल्या आयुष्यातील १९ अनमोल वर्षे तुरुंगात घालवली, ज्यांना 'दहशतवादी' म्हणून शिक्का मारला गेला, त्यांच्या या आयुष्याची भरपाई कोण करणार? असा सवाल करत त्यांच्या कुटुंबांनी भोगलेल्या मानसिक, सामाजिक आणि आर्थिक यातनांचे मोजमाप करणे अशक्य आहे, असेही इनामदार म्हणाले.

ही घटना समाजातील धार्मिक पूर्वग्रहदूषित विचार आणि निष्पाप व्यक्तींना, विशेषतः एका विशिष्ट समुदायातील लोकांना, लक्ष्य करण्याच्या प्रवृत्तीवर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करते. कोणाचाही गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय इतकी वर्षे कोठडीत ठेवणे, ही आपल्या न्यायव्यवस्थेची मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे सन २००२ पासून भारतात झालेल्या सर्व बॉम्बस्फोटाचा नव्याने तपास करावा, अशी मागणी मूलनिवासी मुस्लिम मंच अध्यक्ष अंजुम इनामदार यांनी केली आहे.

इनामदार म्हणाले, दहशतवादी हल्ल्यांनंतर तपास यंत्रणांवर 'जलद कारवाई' करण्याचा प्रचंड दबाव असतो. याच दबावाखाली सखोल आणि निःपक्ष तपास न होता, घाईघाईने निष्कर्षांवर पोहोचले जाते का? २००२ नंतर देशात झालेल्या बॉम्बस्फोटांच्या तपासात तपास यंत्रणांनी समाधानकारक काम केले नाही, उलट अनेकदा निष्पाप लोकांना, विशेषतः मुस्लिम तरुणांना, आरोपी करून तपासाची दिशा बदलली, असे गंभीर आरोप सातत्याने होत आले आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.जर तपास यंत्रणा वास्तविक पुराव्यांऐवजी केवळ संशयाच्या आधारावर किंवा विशिष्ट समुदायाला लक्ष्य करण्याच्या हेतूने काम करत असतील, तर खरा गुन्हेगार मोकळा फिरतो आणि निरपराध व्यक्तींना, त्यांच्या धर्मामुळे, त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात. यामुळे समाजात अविश्वास, द्वेष आणि धार्मिक ध्रुवीकरणाचे विषारी वातावरण निर्माण होते, जे देशाच्या एकात्मतेसाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी घातक आहे.

पुढे ते म्हणाले, न्यायव्यवस्थेपुढील आव्हान आणि धार्मिक भेदभाव या घटनेने आपल्या तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेवर सखोल आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. खरे गुन्हेगार शोधून त्यांना शिक्षा करणे हे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचे आहे ते निष्पाप व्यक्तींचे, कोणत्याही भेदभावाशिवाय, संरक्षण करणे. केवळ धर्माच्या किंवा समुदायाच्या आधारावर कोणालाही संशयाच्या नजरेने पाहणे किंवा त्यांना लक्ष्य करणे, हे कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी अस्वीकार्य आहे आणि ते संविधानाने दिलेल्या समानतेच्या हक्कांचे उल्लंघन आहे.

२००२ नंतर देशात झालेल्या सर्व बॉम्बस्फोटांबाबत उच्चस्तरीय आणि सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. यामध्ये मूळ सूत्रधार कोण आहेत, त्यांची पाळेमुळे कुठे आहेत, कोणती यंत्रणा वापरून ते हे घडवून आणतात आणि तपास संस्था निष्पाप मुस्लिमांना लक्ष्य करून तपासाची दिशा का बदलतात, याची चौकशी होणे देशाच्या सुरक्षेसाठी, न्यायासाठी आणि धार्मिक सलोख्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

## सुनील तटकरेंनीच छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला : मनोज जरांगे




**मुंबई** : लातूरमध्ये छावा संघटनेचे नेते विजयकुमार पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या बेदम मारहाणीच्या घटनेने राज्यात खळबळ उडवली आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुनील तटकरेंनीच मराठा द्वेषातून छावाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला घडवून आणला, असे मनोज जरांगे म्हणालेत. तसेच या प्रकरणी गृहमंत्र्यांनी कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे रविवारी लातूर दौऱ्यावर आले असताना छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर पत्ते फेकत सभागृहात रमी खेळणाऱ्या कृषि मंत्र्याचा राजीनामा घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. छावाचे कार्यकर्ते बाहेर येताच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी घाडगे पाटील यांना मारहाण केली. या प्रकरणावरून अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. या सर्व घडामोडींवर मनोज जरांगे यांनी भाष्य केले आहे.

हा हल्ला तटकरे साहेबांनीच घडवून आणला आहे, अशी आमची शंका आहे. हा घडवून आणलेला, पूर्वनियोजित प्रकार आहे. यामध्ये मराठा समाजाविषयी असलेला द्वेष स्पष्टपणे दिसतो. विजय भैय्या हे शेतकऱ्यांचे लेकरू आहे. ते जर आज मागणी करायला गेलेत तर तुम्ही त्यांना मारता. म्हणजे हे तुम्हाला सोपे जाणार नाही. असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. अजित दादांनी कठोरात कठोर कारवाई करून केवळ पदावरूनच नव्हे तर पक्षातूनच हाकालपट्टी केली पाहिजे, अशी मागणी ही मनोज जरांगे यांनी केली आहे.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, "हे लोक अजितदादांवरही काळे फासण्याचे काम करत आहेत. अजित पवारांचा राज्यात जनाधार वाढतो आहे, तरुण त्यांच्यामागे उभे राहत आहेत. पण काही नाकर्ते, अतिरेकी कार्यकर्ते जर पक्षाच्या पदावर राहिले, तर त्याचा फटका थेट अजितदादांना बसतो. असे लोक पदावर ठेवण्याच्या कामाचे नसतात.

मनोज जरांगे पाटील यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनाही इशारा दिला. ते म्हणाले, "कुठल्याही मंत्र्याने आपल्या पदाची गणीमा राखली पाहिजे. आपण कुठल्या पदावर आहोत राज्याच्या जनतेचा आपण प्रतिनिधित्व करत आहोत. मात्र इथून पुढे देखील कोकाटे साहेबांनी आपल्या स्वभावात बदल करण्याची आवश्यकता आहे. नाहीतर शेतकरी वर्ग त्यांच्या अंगावर जाईल. त्यामुळे त्यांनी मंत्री पदाची, विधान भवनाची आणि राज्यातील मायबाप जनतेची गणिमा आखली पाहिजे. नाहीतर पुढच्या काळात देखील त्यांना त्यांच्या पदावरून पायउतार व्हावे लागेल."

## रम्मीत रमणाऱ्या कृषिमंत्र्याला घरी पाठवा : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची मागणी



**मुंबई** : काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी रम्मीत रमणाऱ्या कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.

राज्यात दररोज 6 शेतकरी आत्महत्या करत असताना राज्याचा कृषिमंत्री विधिमंडळात बसून ऑनलाइन रम्मी खेळतो. हे चित्र महाराष्ट्राची लाज वेशीवर टांगण्याचा प्रकार आहे, असे ते म्हणालेत.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा एक व्हिडिओ सध्या चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यात ते विधिमंडळात बसून ऑनलाइन रम्मी खेळताना दिसत आहेत. या प्रकरणी विरोधकांनी सरकारवर सडकून टीका करत त्यांच्या हकालपट्टीची मागणी केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ या प्रकरणी म्हणाले की, राज्यात दररोज 6 शेतकरी आत्महत्या करत आहेत. पण राज्याचा कृषीमंत्री विधानसभेत बसून ऑनलाईन रमी खेळत आहे. हे चित्र महाराष्ट्राची लाज वेशीवर टांगण्याचा प्रकार आहे. मंत्र्यांना कशाचेच भान राहिले नाही.

आमदार व पदाधिकारी गुंड व मवाली बनलेत. पण मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री या माजलेल्या लोकांना वेसण घालू शकत नाहीत. कारवाई फक्त विरोधी पक्षांवर करण्याची मर्दुमकी दाखवणाऱ्यांनी निर्लज्ज कृषिमंत्री व गुंडगिरी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची धमक दाखवावी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ जुलै २०२५


# काय चालले आहे विधिमंडळात



काय चालले आहे महाराष्ट्रात
विधिमंडळात जोरदार हाणामारी
सामान्यांनी मतं दिली
त्या राज्यकर्त्यांचा प्रताप भारी

सामान्यांच्या कल्याणाचे प्रश्न
अजिबात मांडत नाहीत मंत्री,आमदार
सामान्यांना वाऱ्यावर सोडून देतात
हे तर भांडतात आपापसात

शिक्षण,आरोग्य,नोकरी,महागाई,विषमता
असे कित्येक प्रश्न पडले मागे
कायदा सुव्यवस्थेचा ठिकाणा नाही
गप्पा तर लोकशाहीच्या मारतात भारी

सत्ताधारी अन् विरोधकही सारखेच
जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले
विरोधकांनी शब्दांनीही तोंड नाही उघडले
आमदार,मंत्र्यांच्या तोंडात जणु बोळे कोंबले

तरूणांनी त्यांचा काय आदर्श घ्यावा ?
त्यांच्याकडेच मानवतेचे संस्कार नाहीत
मंत्री,आमदार सारे दिशाहीन
ते महाराष्ट्राचे काय भले करणार?

सामान्यांचे कल्याण साधायचे
त्यांच्याच हातात आहे
ज्या मतदारांनी विश्वास टाकला
त्यांचा विश्वासघात करणे बरे नव्हे

मुख्यमंत्रीसाहेब म्हणाले
आमदार माजले ही लोकभावना आहे
गरिबांना एकवेळेचे खायला नाही
आमदाराकडे सारे घबाडच घबाड आहे


**प्रा. डॉ. सतीश मस्के, पिंपळनेर, धुळे**
**मो.** 75075 04046


# श्री विठ्ठलसाईचे रोलर पुजन संपन्न



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : श्री विठ्ठलसाई कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५ - २६ साठीचे रोलरचे पुजन सोमवार (दि.२१) सकाळी १०.३० वाजता माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन मा. श्री.बसवराजजी पाटील साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना श्री पाटील साहेब म्हणाले की, हंगाम २०२५ - २६ मध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील संपूर्ण ऊसाचे वेळेवर गाळप केलेजाईल. तसेच सक्षम ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा भरती करण्यात आली आहे. कारखाना मशिनरीदुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येत असून ऊस उत्पादक व सभासदांनी जास्तीत जास्त ऊस देवून सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी काशी, श्रीशैल्यम व उजैन पीठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष मा. श्री. बापुरावजी पाटील साहेब, उमरगा जनता सहकारी बॅंकेचे चेअरमन मा. श्री. शरणजी पाटील साहेब, व्हा.चेअरमन सादीकसाहेब काझी, कारखान्याचे सर्व संचालक श्री केशव पवार, शरणप्पा पत्रिके, विठ्ठलराव बदोले, शब्बीर जमादार,विठ्ठलराव पाटील, राजीव हेबळे,दिलीप भालेराव, व्यंकटराव खरोसेकर, अँड. संजय बिराजदार, माणिकराव राठोड, संगमेश्वर घाळे,सुभाष राजोळे, दिलीप पाटील, श्रीमती मंगलताई गरड, सौ. इरम्माताई स्वामी, शिवमुर्ती भांडेकर, शिवलिंग माळी, तसेच करंजकर महाराज सोलापूर, बिलाल काझी, शौकत पटेल, युसुफ मुल्ला,देवेंद्र कंटेकुरे, गणेश अंबर, साधुराम हिंडोळे, सतिश बालकुंदे व पत्रकार आदीसह कारखान्याचे कार्यकारी संचालक एस. आर. गवसाणे, कारखान्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार, ऊस उत्पादक शेतकरी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECTOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास



ADMISSION OPEN
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ जुलै २०२५


## कन्नड तालुका खरेदी विक्री संघाच्या सभापतीपदी ज्ञानेश्वर निकम



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या सभापती पदी, आ. संजनाताई जाधव यांचे कट्टर समर्थक तथा आडगाव जे. चे मा.सरपंच ज्ञानेश्वर आण्णा निकम यांची तर उपसभापती पदी भगवान कांदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.नुकत्याच झालेल्या खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत आ.सं◌ंजनाताई जाधव, भरतसिंग राजपूत, जयेश बोरसे, मनोज राठोड यांच्या नेतृत्वाखाली शिवशाही शेतकरी विकास पॅनल ने सर् 15 जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व मिळविले होते. दि.21 जुलै रोजी झालेल्या बैठकीत संस्थेच्या चेअरमन पदी ज्ञानेश्वर निकम यांची तर उपसभापती पदी भगवान कांदे यांची निवड करण्यात आली. उर्वरित सदस्य पुढील प्रमाणे रंगनाथ आल्हाड, राजकुमार गंगवाल, रामेश्वर घनकर, आकाश बोलधने, प्रविण राठोड, अब्दुल असद, निरंजन चव्हाण, प्रकाश राजपूत, लक्ष्मण साठे, मिनाबाई निकम, सुनीता मालोदे, प्रताप गुजर, निवड जाहिर होताच कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित सभापती, उपसभापतींचे अभिनंदन केले. याप्रसंगी आ.सं◌ंजनाताई जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. मनोज राठोड, उपसभापती जयेश बोरसे, आदित्य गर्जे, रामकाका पवार, भगवान शेजवळ, कृष्णा बोरसे, जावेद शेठ, कांताशेठ सोनवणे, पंढरीनाथ निकम, रवि राठोड, सिध्देश्वर झाल्टे, हरिष थोरात, साळुबा उबाळे, किशोर पवार, आनंद चव्हाण, विठ्ठल निकम, राजू मोकासे, अशोक वाळुंजे, यासिम खान, संदीप घोंगटे, अशोक दापके भगवान बारगळ आदी उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे जेईएस महाविद्यालयात उद्घाटन



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** येथील जेईएस महाविद्यालय जालना, येथे दि.१९जुलै रोजी महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि जालना जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन जालना, आणि जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा योगासन स्पर्धा शनिवार दि. १९ जुलै २०२५ शनिवार रोजी जेईएस महाविधालय येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. आरती मंत्री शल्य चिकित्सक जालना, यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्रीहोते, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा योगा संघटनेचे अध्यक्ष, व्ही एस एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद मदन,हे होते. व्यासपीठावर प्रा. डॉ. बप्पा मस्के हे होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. आरती मंत्री यांनी योग आणि शरीर संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन योगविद्या शिकली पाहिजे. योग फक्त एक ठराविक वयातील लोकांसाठीच आहे ही गोष्ट मनातून काढून टाकली पाहिजे, योगा कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे असेहि डॉ मंत्री यांनी सांगितले. विशेष निमंत्रित डॉ. बप्पा साहेब मस्के यांनी सर्व विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून शुभेच्छा दिल्यात.या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी सांगितले की जिल्ह्यात योग प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करणे आवश्यक आहे. म्हणून पुढील पाच वर्षात आपण देखील जिल्ह्यात राज्य स्तरीय योग स्पर्धेचे आयोजन करू, असे जाहीर केले. जिल्हा संघटनेचे सचिव डॉ. हेमंत वर्मा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर डॉ. किशोर बिरकायलु यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन कु. साक्षी जन्हाड हिने केले, या प्रसंगी प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, प्रा .राहुल सारस्वत, श्री, विलास बोधले, श्री दायमा.श्री. राधाकिशन आदी उपस्थित होते.क्रीडा विभागाचे सर्व खेळाडू यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतलेत.यावेळी पुढील स्पर्धा घेण्यात आली.१) ट्रॅडिशनल योगासन २) आर्टिस्टिक योगासन सिंगल३) आर्टिस्टिक योगासन पेअर ४) रिदमिक योगासन पेअर ५) फॉरवर्ड बेंड इंडिव्हिज्युअल इव्हेंट ६) बॅक बेंड इंडिव्हिज्युअल इव्हेंट७) हॅन्ड बॅलेन्स इंडिव्हिज्युअल इव्हेंट८) लेग बॅलन्स इंडिव्हिज्युअल इव्हेंट९) ट्विस्टिंग बॉडी इंडिव्हिज्युअल इव्हेंट१०) सुपाइन इंडिव्हिज्युअल इव्हेंटिसिनयरसीनियर A.B.C गटातील खेळाडू आर्टिस्टिक योगासन सिंगल आर्टिस्टिक योगासन पेअर अशी माहिती डॉ. हेमंत वर्मा,यांनी दिली. या स्पर्धांसाठी जालना शहरातील खेळाडू व क्रीडा प्रेमी उपस्थित होते

## विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यातील सुसंवाद वाढला पाहिजे - प्रा. दिलीप पाटील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**जालना :** शिक्षणाचा उद्देश हा चांगला माणूस बनणे हा आहे. मात्र अलीकडे या विचारांचा सर्वांनाच विसर पडला आहे. शिक्षणातून ताण तणाव निर्माण होत आहे. आज विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यातील संवाद थांबला आहे. हा संवाद अधिकाधिक झाला पाहिजे. असे प्रतिपादन दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, जळगाव येथील प्रा. दिलीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात मार्गदर्शन करताना केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आयोजित करिअर कट्टा या कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, आपण निवडलेला कोणताही अभ्यास विषय हा आपले व्यक्तिमत्व संपन्न बनविण्यासाठी मदत करतो. ज्याच्यावर उत्तम संस्कार झाले आहे असा व्यक्ती उत्तम नागरिक बनतो. आपण अधिकाधिक मूल्य संस्काराने परिपूर्ण व्हायला हवे. महाविद्यालयीन जीवनातील मूल्ये आपल्या आयुष्याची दिशा ठरवितात. समाजातील एक उत्तम नागरिक बनण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी काळानुसार स्वत:मध्ये बदल करायला हवेत. प्रत्येकात यशस्वी होण्याची भरपूर क्षमता असते मात्र आपण पराभवाच्या भीतीने खचतो. ही भीती आपल्या मनातून काढून टाकली पाहिजे. अवांतर वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व समृद्ध बनते. पुस्तके आपणाला जगण्याचा मार्ग दाखवितात. आळस झटकून कृतिशील बना. चांगल्या सवयीचा अंगीकार करा ज्या तुमचे जीवन उज्वल करेल. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. परिचय प्रा.डॉ.चंद्रकांत धोत्रे यांनी करून दिला तर सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. डॉ. बळीराम कटारे यांनी केले. आभार प्रा. प्रमोद अवचार यांनी मानले. यावेळी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. निलेश बर्डे, प्रा. विलास भुतेकर, प्रा. रामेश्वर मस्के, प्रा.दीप्ती जैन यांच्यासह बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ जुलै २०२५


## संजय राऊतांच्या ट्विटला गिरीश महाजन यांचे जोरदार प्रत्युत्तर



**मुंबई** : राज्यात हनीट्रॅपची चांगलीच चर्चा सुरू आहे. पावसाळी अधिवेशनात कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी थेट पेनड्रायव्ह देखील दाखवला होता. हनी ट्रॅपचे हे प्रकरण नशीहकमधून आता जळगावच्या जामनेरपर्यंत पोहोचले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मंत्री गिरीश महाजन आणि प्रफुल लोढा यांचा सोबतचा फोटो ट्विट केला आहे. या फोटोची सीबीआय चौकशी व्हावी, दूध का दूध पाणी का पाणी होईल, असे त्यांनी म्हटले आहे. यावर मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेत पलटवार केला आहे.

पत्रकार परिषद घेत गिरीश महाजन म्हणाले, प्रफुल्ल लोढा हा सर्वपक्षीय कार्यकर्ता आहे. तो अनेक पक्षात होता. शरद पवार, जयंत पाटील, अजित दादा पवार, उद्धव ठाकरे आणि सुप्रिया सुळे यांच्या सोबत प्रफुल्ल लोढा यांचे फोटो आहेत, असे म्हणत त्यांनी मोबाईलमध्ये प्रफुल्ल लोढा याच्यासोबत नेत्यांचे असलेले फोटो दाखवले. मग उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांचा पण हनीट्रॅपशी संबंध आहे का? या सर्वांची पण सीबीआय आणि एसआयटी चौकशी करायची का? असा सवाल गिरीश महाजन यांनी उपस्थित केला आहे.

एकनाथ खडसे यांनी प्रफुल्ल लोढाने गेल्या वर्षी गिरीश महाजन आणि रामेश्वर नाईक यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. स्थानिक पोलिस या प्रकरणाचा तपास करु शकणार नाहीत, यासाठी एसआयटी स्थापन करावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. यावर गिरीश महाजन यांनी प्रत्युत्तर देत म्हटले, एकनाथ खडसे हे प्रफुल्ल लोढाच्या एसआयटी चौकशीची मागणी करत आहेत, पण काही वर्षापूर्वी लोढा याने खडसे यांच्या मुलाच्या आत्महत्येच्या प्रकरणाच्या एसआयटी चौकशी मागणी केली होती. एकनाथ खडसे यांच्या मुलाचा मृत्यू कसा झाला, त्यावेळी मी खडसे यांच्या सोबत होतो, मग त्या प्रकरणाची आता चौकशी करायची का? असा पलटवार महाजन यांनी केला.

मी एवढ्या खालच्या पातळीवर जाणार नाही, पण खडसे यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. कोणत्याही प्रकरणात मीच त्यांना दिसतो. काही वर्षापूर्वी व्हिडिओ बघितले होते प्रफुल्ल लोढा अत्यंत खालच्या भाषेत एकनाथ खडसे यांना बोलताना दिसत आहे. त्याला काय म्हणावे? कोणत्याही प्रकरणात खडसे माझा संबंध जोडून माझी बदनामी करतात. त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे, पण मी खालच्या पातळीवर जाणार नाही. प्रफुल्ल लोढाला पोलिसांनी अटक केली आहे, त्याची चौकशी पोलिस करतील. जे सत्य आहे ते समोर येईलच, असेही गिरीश महाजन यांनी म्हटले.

## धर्मादाय संस्थांच्या वार्षिक उत्पन्नातून अंशदान वसुली होणार : उच्च न्यायालयाचे शासनाला निर्देश



**पुणे** : मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम ५७ अन्वये धर्मादाय संस्थांच्या एकूण वार्षिक उत्पन्नातून २% रक्कम अंशदान रक्कम 'सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था व्यवस्थापन निधी' मध्ये जमा करण्यात येत होते. २००९ साली अशी रक्कम साधारणतः अडीचशे कोटी रुपयांवर संकलित झाल्याने देवेंद्र प्रकाश शहा यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करून अंशदान स्वीकारण्यावर स्थगिती घेतली होती. तेंव्हापासून ही याचिका प्रलंबित होती. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांचे खंडपीठासमोर याची नुकतीच सुनावणी झाली. त्या मध्ये न्यायालयाने उपलब्ध रक्कम, अपेक्षित खर्च आणि आवश्यक निधीचा फेरआढावा घेऊन किती टक्के अंशदान आकारण्यात यावे याचा निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.

या कामी राज्याचे धर्मादाय आयुक्त शामकांत कलोती यांनी या प्रदीर्घ कालावधीमध्ये संपूर्ण राज्यातील धर्मादाय कार्यालयातील परिस्थितीमध्ये अमुलाग्र बदल झाल्याची बाब महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांचे मार्फत उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून दिली. २०२२ साली धर्मादाय विभागाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार अंशदान स्वीकारण्यास स्थगिती असल्याने २००९ ते २०२२ या कालावधीत सुमारे ४३० कोटी रुपये शासनाने धर्मादाय आस्थापनेवर खर्च केले आहेत. पायाभूत सुविधा, विभागीय कार्यालये, संगणकीकरण इत्यादीसाठी सुमारे ५७० कोटी रुपये धर्मादाय विभागाकडून शासनाला देय आहेत. अशा सर्व बाबींचा विचार करता अंशदान स्वीकारण्यावर असलेली स्थगिती उठवण्यात यावी अशी मागणी केली होती.

सदरहू स्थगिती सरसकट उठवण्याआधी बदललेल्या परिस्थितीचा साकल्याने विचार करून ट्रस्ट कायद्याच्या कलम ५८ (४) नुसार उचित अंशदानाची टक्केवारी निश्चित करण्याचे उपरोक्त आदेश खंडपीठाने शासनाला दिले आहेत.

पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, पुणे माजी अध्यक्ष ॲड शिवराज कदम म्हणाले,शासनाने अंशदान ठरवण्यात येताना प्रत्येक न्यासाचे आर्थिक उत्पन्न लक्षात घेऊन आयकर कायद्यानुसार जसे विविध स्तर आहेत तसे अंशदान ठरवण्यात यावे. म्हणजे कमी उत्पन्न असलेल्या न्यासांना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही. आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या संस्थांना तांत्रिक कारणावरून सूट देवून वगळण्यात येवू नये.

## विधिमंडळातील गुंडगिरीचा निषेध:सभागृहात प्रवेश करण्याची इच्छाच संपली माजी आमदारांकडून उद्विग्न भावना व्यक्त

**पुणे** : आम्ही आहोत पुणे शहरात राहणारे माजी आमदार, आज आम्ही राजकारणात सक्रीय आहोत असा आमचा दावा नाही, पण कधीतरी आम्ही आमदार होतो आणि महाराष्ट्राच्या विधानसभेत सदस्य म्हणून बसत होतो. आम्ही कोणत्या राजकीय पक्षातर्फे जनतेचे प्रतिनिधी म्हणून विधानसभेत बसत होतो ही बाब गौण आहे. आमच्या काळात विधानसभेचे सभागृह राज्यातील सर्वोच्च पवित्र असे मुक्त संवादाचे, प्रामाणिक मतभेद व्यक्त करण्याचे तीर्थ स्थळ होते, हे सर्वोच्च सभागृह पूर्णपणे सुरक्षित होते, आता आमची इच्छाच मेली अशी उद्विग्न भावना पुण्यातील माजी आमदारांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र विधिमंडळात गुंड व गुन्हेगारांच्या हैदोसाविरोधात पुणे स्थित ज्येष्ठ माजी आमदारांची युवक क्रांती दलाच्या वतीने संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. या प्रसंगी डॉ. कुमार सप्तर्षी, ॲड. वंदना चव्हाण, ॲड. जयदेवराव गायकवाड, बाळासाहेब शिवरकर, ॲड. एल. टी. सावंत, संयोजक राहुल डंबाळे आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. सप्तर्षी म्हणाले, महाराष्ट्रात राहणाऱ्या १२ कोटी जनतेने आपल्या मतदानाद्वारे विधानसभेत लोकांच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी २८८ लोकप्रतिनिधी निवडून दिलेले असतात, त्यांनी लोकांच्या सुखदुःखाचे, भावनांचे, सोयी-गैरसोयीचे प्रतिनिधीत्व करायचे असते, या कर्तव्याचा आम्हाला सातत्याने जाणीव असायची, त्यासाठी आम्ही फक्त माध्यम आहोत, हे आम्ही लक्षात ठेवायचो. सभागृहाचे खरे मालक राज्यात राहणारे नागरिक आहेत, जनहिताला मारक कायदे या कायदेमंडळात संमत होणार नाहीत हे डोळयात तेल घालून पाहायचे, हे अल्पमतातल्या विरोधकांचे कामच असते, तसेच ज्यांनी विधिमंडळात बहुमत प्राप्त केले असेल, त्यांनी सरकार स्थापन करून जनहिताचे रक्षण करणे, जनताभिमुख धोरणे अंमलात आणून राज्याचा विकास करणे, ही कामे अपेक्षित असतात,

सध्या मात्र गंगा उलट्या दिशेने वाहू लागली आहे. आमदार संवादापेक्षा एकमेकांना साता जन्माचे वैरी मानू लागले आहेत. लोकशाहीचे मंदिर तोच उद्ध्वस्त करू शकतो, ज्याला लोकशाही अमान्य आहे. लोकशाही प्रणालीत सत्तारूढ पक्षाने विरोधी पक्षाला वैरी मानायचे नसते. परंतु महाराष्ट्राचे सरकार तिकडमबानी करून संधिसाधू प्रवृत्तींना एकत्र करून स्थापन झाले असल्यामुळे ते विरोधक संपुष्टात आणण्याचा प्रयत्न करीत आहे, हे स्पष्ट झाले आहे. आजचे विधिमंडळ बरखास्त करून नव्याने निवडणूक घेणे आवश्यक असल्याचे दिसते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २२ जुलै २०२५


## मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला करण्याचा प्रयत्न



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या येथील निवासस्थानी एका तरुणाने हल्ला केल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात दिव्य मराठी डिजिटलने मंत्री संजय शिरसाट यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क झाला नाही. पण नंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही घटना गंभीर असल्याचे स्पष्ट केले.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सौरभ घुले असे आरोपी तरुणाचे नाव आहे. हा तरुण रविवारी मध्यरात्री मंत्री संजय शिरसाट यांच्या येथील निवासस्थानालगत आला. त्यावेळी तो मद्यधुंद अवस्थेत होता. त्याने त्याच स्थितीत शिरसाट यांच्या बंगल्याच्या दिशेने दगडफेक केली. यावेळी त्याने शिवीगाळही केली. सदर तरुणाने हे कृत्य का केले? हे समजले नाही. पण त्याने हा प्रकार दारुच्या नशेत केला असावा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच सातारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सदर तरुणास ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल केला. पोलिस पुढील तपास करत आहेत.

संजय शिरसाट यांनी या घटनेवर आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, माझ्या घरावर हल्ला करणारा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर 302 चे गुन्हे दाखल आहेत. 'आज मुझे बडा काम मिला है' असे तो आपल्या मित्राला सांगत होता. मला ही घटना साधारण वाटली होती, पण आता ती गंभीर होणार आहे. मी पोलिसांशी बोलून याबाबत माहिती घेणार आहे. मी त्याला ओळखत नाही. पण तो माझ्या मतदारसंघातील आहे.

पुढे बोलताना शिरसाट म्हणाले की, मला अनेकदा धमक्या आल्या, पण मी कधी बोललो नाही. पण हे प्रकरण वेगळे आहे. आरोपी पोलिसांना धमकावत होता. अशा लोकांना जरब बसणे आवश्यक आहे. या प्रकरणी पोलिस योग्य तो तपास करतील. मला अधिकच्या संरक्षणाची गरज नाही. ही घटना घडली तेव्हा लाईट गेल्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडलेले होते. जनरेटर चालू करायला वेळ लागला.

यापूर्वी गत नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत एका अज्ञात व्यक्तीने संजय शिरसाट यांचे सुपुत्र सिद्धांत शिरसाट यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली होती. त्यात त्यांच्या गाडीची काच फुटली होती. मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असताना ही घटना घडली होती. त्यामुळे एकच खळबळ माजली होती.

उल्लेखनीय बाब म्हणजे संजय शिरसाट सध्या एका व्हिडिओमुळे वादात सापडलेत. या व्हिडिओत ते आपल्या बेडरुममध्ये पलंगावर बनियनवर बसल्याचे दिसून येत आहेत. त्यांच्या शेजारी पैशाने भरलेली बॅगही दिसून येत आहे. या प्रकरणी विरोधकांनी टीकेची झोड उठवल्यानंतर त्यांनी सदर बॅग पैशांची नव्हे तर कपड्यांची असल्याचा दावा केला. ते म्हणाले, तो व्हिडिओ माझ्या बेडरूममधीलच आहे. मी प्रवासातून आल्यानंतर बेडवर बसल्याचे दिसून येत आहे. तिथे माझा श्वान घुटमळत आहे. माझी कपड्यांची बॅगही तिथे आहे. त्याची बातमी होते. याचे मला आश्चर्य वाटते.

आमच्याकडे मातोश्री व मातोश्री -2 नाही. माझे घर माझ्या मतदारसंघातील प्रत्येकासाठी उघडे असते. कार्यकर्ते येतात. उत्हासाच्या भरात त्यांच्यापैकी एखाद्याने हा व्हिडिओ काढला असेल. माझ्या घरात चिठ्ठी देऊन कुणालाही बोलावले जात नाही. काम काय, नाव काय, या गोष्टीही विचारल्या जात नाहीत. आम्हाला शिवसेना प्रमुखांनी शिकवले आहे की, तुम्ही कार्यकर्ता म्हणून राहा, नेता व्हायचा प्रयत्न करू नका. त्यानुसार, आजही आम्ही त्याच भूमिकेत आहोत, असे ते म्हणाले.

## गायरान जमिनीवरील अतिक्रमण हटवण्याच्या आदेशाला विरोध



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाधिकारी यांनी १७ जुलै २०२५ रोजी शासकीय गायरान जमिनीवरील अतिक्रमण सरसकट काढून टाकण्याचे आदेश काढले आहेत. या आदेशामुळे जिल्ह्यातील गायरान अतिक्रमणधारक नागरिक बैचेन झाले आहेत. या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विभागीय उपायुक्त यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले तसेच कार्यालयाबाहेर आदेशाची होळी करण्यात येऊन विरोध प्रदर्शित करण्यात आला.

जिल्ह्यातील गायरान जमिनीवर प्रशासनानेच विविध घरकुल जसे पंतप्रधान, शबरी, रमाई अशा घरकुल योजनेचा लाभ गायरान जमिनीवर देण्यात आला आहे. या अतिक्रमण करून राहणाऱ्या गरीब भुमिहीन लोकांना जिल्हाधिकारी, पालकमंत्री यांच्या सल्ल्याने बेघर करणार आहे का? असा प्रश्न वंचितच्या वतीने विचारण्यात आला.

पालकमंत्री संजय शिरसाट यांना जिल्ह्यातील गायरान जमिनीवर शेती करून उपजीविका भागवीणारे व घरे करून राहणाऱ्या गरीब भूमिहीन कुटुंबांचे अतिक्रमणे हटवून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्ह्यातील गायरान जमिनी लाटायच्या आहे, असा आरोपही वंचितने यावेळी केला.

यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमाकूल करण्यात असे आश्वासन दिले होते, हे विभागीय उपायुक्त महसूल यांच्या निर्दशनास आणून दिले. याही पलीकडे जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही चालू ठेवली तर वंचित बहुजन आघाडी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून दिला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी आदेशाची होळी करून आपला विरोध दर्शवला.

आंदोलनात जिल्हाध्यक्ष योगेश बन यांच्यासह सतीश गायकवाड, संदीप जाधव, जिल्हा उपाध्यक्ष रुपचंद गाडेकर, सतीश शिंदे, भगवान खिल्लारे, मिलिंद बोर्डे, भाऊराव गवई, नितीन भुईगळ, कोमल हिवाळे, गणेश खोतकर, सुभाष कांबळे आदी पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील शासकीय गायरान जमिनीवरील शेती करून उपजीविका भागविण्यासाठी कसत असलेल्या अतिक्रमणधारकांनी परिपूर्ण प्रस्ताव स्वतः तर घराच्या अतिक्रमणधारकांनी ग्रामपंचायतीमार्फत प्रस्ताव तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केले असून त्याला तहसीलदार उपविभागीय अधिकारी हे केराची टोपली दाखवतात. याचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेऊन लोकांना न्याय देण्याऐवजी लोक रस्त्यावर कसे येतील या भुमिकेत वागत असल्याचा आरोप यावेळी पदाधिकाऱ्यांनी केला.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**